# रौप्यमहोत्सवी वर्ष

बालनाट्य

The Theatre Group

that has catered to two generations

राधा निवास, टिळक रोड, मुंबई ४०० ०१४.
टेलिफोन: ४१२ ३१ ४२

२५ वर्षं! संस्थेच्या आयुष्यातला एक टप्पा!

१९६२ साली आम्ही ही संस्था स्थापन करायचं ठरवलं, ते बालरंगभूमीच्या अतीव ध्यासानं. आमचा विचार आम्ही मधुकर नाईक, कमलिनी आणि जनार्दन फडके, विद्या वैद्य, नीळकंठ जोशी या मित्रमंडळींना सांगितला मात्र, त्यांनी लगेच जीव ओतून मदत करायला सुरूवात केली. अधिक तर बालनटांनीच भूमिका केलेल्या 'तीन नाटिकां'चा प्रयोग, के सी कॉलेजमध्ये, माननीय श्री. पु. ल. देशपांडे यांच्या उपस्थितीत पार पडला, आणि संस्था रीतसर सुरू झाली.

संस्थेचा उद्देश काय होता? मुलांसाठी नाटकं ही कल्पना आपल्याकडे फारशी रूजलेली नव्हती. शाळांच्या स्नेहसंमेलनांमधून नाटुकली बसवली जात, नाही असं नाही. पण प्रौढांसाठी जशी नाटकाची गरज आपण गृहीत धरतो, तशी मुलांनाही त्यांच्याजोगती नाटकं पाहाण्याची गरज असते, किंबहुना त्यांच्या विकासासाठीच नाटकाची आवश्यकता असते, हे त्या वेळी सर्वांना पटलेलं नव्हतं. हे पटवण्यासाठी, साजशृंगारासकट नाट्यगृहांत मुलांची नाटकं करणं, हा एक मार्ग होता. परंतु त्यात नाट्यगृहाचं भाडं, जाहिरात इत्यादि दुय्यम गोष्टींवर इतका खर्च होतो, की मुलांसाठी, त्यांना परवडेल अशा दरात नाटक दाखवणं अशक्य होऊन बसतं. त्याहूनही अधिक वाईट म्हणजे, नाटक ही गोष्ट फार अंतरावरची, 'शो विन्डो' प्रमाणे केवळ पाहाण्याची, आणि मुख्य म्हणजे केवळ पोशाखी आहे, अशी कल्पना मुलांच्या डोक्यात जाऊन बसते. याउलट, नाटक हे मुलांच्या ओळखीच्या वातावरणात, त्यांच्याशी गप्पा मारत, हसत खेळत, त्यांना आपलंसं करून, शक्य तेवढ्या मोकळेपणानं, साधेपणानं करण्याची-पाहाण्याची गोष्ट आहे, हे आम्हांला मुलांच्या मनावर ठसवायचं होतं. म्हणून आम्ही शाळाशाळांमधून अगदी स्वस्त दरात, म्हणजे जवळ जवळ त्यांच्या, दुपारच्या खाऊच्या पैशांत नाटक दाखवायचं, असं ठरवलं.

अर्थात् हे स्वस्त नाटक सवंग असून चालणार नव्हतं. उत्कृष्ट निर्मितीमूल्यं, आणि संहिता, दिग्दर्शन, अभिनय, नेपथ्य, प्रकाशयोजना या सर्वच अंगांनी उत्तम नाट्याविष्कार त्यात असणं आवश्यक होतं. यासाठी रंगभूमीचा मुळापासून विचार करून आम्ही सांकेतिक नाटकांपेक्षा वेगळी नाटकं लिहिली-बसवली. यात नेपथ्याचा पसारा नव्हता, तर कल्पनाशक्तीला आवाहन करणारी नाट्यपूर्ण रचना होती. शिवाय, मुलांमध्ये मूल होणाऱ्या लवचिक, टवटवीत तरूणतरूणींचा अभिनय होता. राजा बापट, रमेश होनावर, सुरेश खरे, पुष्पा म्हात्रे, विनायक पै, ही आमच्या सुरूवातीच्या नाटकातली नटमंडळी. त्यानंतर दहा वर्षांनी आलेले दिलीप प्रभावळकर, रवी पटवर्धन, विजय साळवी, मिनल परांजपे, प्रदीप भिडे, मीना नाईक, अजय वढावकर, अनंत जोग, यांना तुम्ही आजही नाटक-चित्रपट-दूरदर्शन या माध्यमांमध्ये पाहाता, यांतल्या बऱ्याच जणांनी आपली पहिली पावलं आमच्या रंगमंचावर टाकली, याचा आम्हांला सार्थ अभिमान वाटतो.

शाळाशाळांमधून प्रयोग करीत असतांना, नाट्यगृहांमधूनही आम्ही नाटकांचे प्रयोग करीत होतोच. हे दोन्ही प्रकारचे प्रयोग, आणि दरवर्षी वेगवेगळ्या प्रकारची नाटकं लिहून ती रंगभूमीवर आणणं यात खूपच वेळ आणि पैसा खर्च होऊ लागला. तरीही आम्ही 'निम्माशिम्मा राक्षस,' 'अचाटगावची अफाटमावशी,' 'अलिबाबाचं खेचर नि ३९ वा चोर' यासारखी विडंबन नाट्यं, 'गाणारी मैना' सारखं काव्यात्म नाटक, 'अद्‌भुताच्या राज्यात' हा एकपात्री प्रयोग, 'अदृश्य माणूस' सारखा शास्त्रीय संशोधनावर आधारीत फार्स, 'इंद्राचं आसन, नारदाची शेंडी' सारखं आजच्या नजरेतून पाहिलेलं पौराणिक आख्यान, 'सावळ्या तांडेल' सारखं पूर्ण ऐतिहासिक साहसनाट्य, असे नाटकांचे अनेक प्रकार जिद्दीनं रंगमंचावर आणले. रंजनाबरोबरच, मुलांची अभिरूची सुधारेल, निदान त्यांना चांगल्यावाईटातला फरक कळेल इतपत संस्कार करण्याच्या हेतूनं आम्ही या नाटकांचे महाराष्ट्रांत आणि महाराष्ट्राबाहेरही अनेक प्रयोग केले. यातली बहुतेक नाटकं पुस्तक रूपानं प्रकाशित करून 'पॉप्युलर प्रकाशन'चे श्री रामदास भटकळ यांनी आपली बालरंगभूमीविषयींची आस्था दाखवली. यापैकी काही पुस्तकांना महाराष्ट्र शासनाची उत्कृष्ट बालसाहित्याची पारितोषिकंही मिळाली. मराठी बालनाटकांच्या तुटपुंज्या गंगाजळीत या पंधरा सोळा संपूर्ण तीन अंकी नाटकांनी लक्षणीय भर घातली, असं म्हटलं, तर ते विनयाला सोडून होईल का?

शाळांमधे किंवा नाट्यगृहांत, कुठंही केली तरी ही नाटकं मुलांच्या मनाला भिडत. हसून, आरडाओरडा करून, पात्रा-प्रसंगांना दाद देऊन मुलं रंगमंदिरं डोक्यावर घेत.



त्या हसणाऱ्या, टाळ्या वाजवणाऱ्या चिमखड्यांनी, आणि ऑफिसची कामं करून मरगळल्या नंतर उलट मुलांसाठी मेहनत करून ताजंतवानं होणाऱ्या नटांनी-कार्यकर्त्यांनी, गेली २५ वर्षं संस्था जिवंत ठेवली. प्रौढांच्या नाटकांइतकीच गांभीर्यानं दखल घेऊन बालनाटकांना दाद देणाऱ्या पत्रकारांचाही संस्था टिकवण्यांत महत्त्वाचा वाटा आहे. महाराष्ट्र शासनानं, मुंबई महानगरपालिकेनं, आणि थोडीफार संगीत नाटक अकादमीनंही आर्थिक मदत केली. शाळांच्या सोयीनं त्यांच्या नाट्यगृहात, त्यांच्या सोयीच्या वेळांत, सोयीच्या दरांत नाटकं दाखवण्याची तयारी आम्ही नेहमीच दाखवली: पण त्या प्रमाणात शाळांचा प्रतिसाद लाभला नाही. अर्थात यापुढं तो वाढत्या प्रमाणात मिळेल, ही आशा आम्हाला कायमच आहे!

गेल्या २५ वर्षांत, संस्था चालवतांना अनेक अडचणी आल्या. बालरंगभूमी ही किती बेनफा गोष्ट आहे, हे या क्षेत्रात किती कमी संस्था काम करतात, यावरूनच कळतं. मुख्य अडचण अर्थातच आर्थिक! मुलांसाठी प्रेमानं, हौसेनं केलेली खर्चिक निर्मिती, सवलतीचे तिकीट दर, आणि याउलट कुठलीही सवलत न मिळता भरावी लागणारी थिएटर भाडी- जाहिरात, यांच्या कात्रीत सापडलेला हा उद्योग उघडच आतबट्ट्याचा ठरणार! त्यांतून गोडाउनमधे ठेवलेलं सामान वाळवीनं खाल्लं, कधी पावसानं भिजलं, कधी चोरीला गेलं, अशी अनेक गंडांतरं. यातून संस्था आजवर टिकली, ती आमच्या कानातल्या त्या हशाटाळ्यांच्या आवाजामुळं, आणि नट-कार्यकर्त्यांनी दोन तपं दाखवलेल्या श्रद्धेमुळं. त्यांच्यापैकी काहींची मुलं आज त्यांच्या जागी कामं करू लागली आहेत: तर काहींना कामापायी क्षणाची फुरसत नसूनही, संस्थेचं कार्य म्हटलं की ते हातचं काम बाजूला ठेवून तत्परतेनं येतात.

परंतु, केवळ कार्यकर्त्यांच्याच नाही, तर पत्रकारांच्या, सामाजिक कार्यकर्त्यांच्या, शाळाचालकांच्या, पालकांच्या, सर्वांच्याच सहकार्याची, हातभाराची आम्हांला नितांत गरज आहे. संस्थेचं कार्य सातत्यानं चालू राहावं, ते मुलांपर्यंत पोहोचावं, त्यांच्यासाठी नवनवीन योजना आखता-राबवता याव्यात, यासाठी! आपणासारख्यांचा हा सहभाग वैचारिक असेल, शारीरिक असेल, आर्थिक असेल, पण तो हवा! कारण मुलांसाठी नाटकं ही सगळ्या समाजाचीच गरज आहे.

२५ हे ऐन उमेदीचं वय आहे, पुन्हा सगळी नव्यानंच सुरुवात होतेय, असं वाटतंय! काळ बदलला आहे, मुलांच्या गरजा बदलत आहेत, हे लक्षांत घेऊन काही नवीन कार्यक्रम आखत आहोत.

कळावे, लोभ असावा, आणि या रौप्यमहोत्सवी वर्षात व त्यानंतरही तो वारंवार दिसावा.

आपले,

रत्नाकर मतकरी
प्रतिमा मतकरी

'बालनाट्य' करिता

## रौप्यमहोत्सवी वर्षाचे काही कार्यक्रमः

१. मुलांसाठी नाटयशिबिराचं आयोजन.
नाटक म्हणजे काय, त्याचा आपल्या व्यक्तिमत्वाशी संबंध काय, याविषयी नेमकी जाण मुलांना (९ ते १५ वर्षांपर्यंतच्या) देणं, हा या शिबिराचा उद्देश. तो सफल व्हावा, यासाठी मान्यवर तज्ज्ञांचं मार्गदर्शन, प्रात्यक्षिकं इत्यादी.

२. शिक्षक व इतरांसाठी बालनाटय-शिबिर.
बालरंगभूमीची मूलतत्त्वं समजावून देण्यासाठी, बालनाटयं बसवणाऱ्या शिक्षकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी.

३. शिबिरार्थींनी बसवलेल्या एकांकिकांचे प्रयोग.

४. मुलांच्या एकपात्री, द्विपात्री नाटयस्पर्धा.

५. मुलांसाठी दोन नवीन नाटकांची निर्मिती.

६. 'आनंदयात्रा'साठी एका नवीन नाटकाची निर्मिती.

७. 'बालनाटय'च्या पूर्वी गाजलेल्या नाटकांची पुनर्निर्मिती.

८. 'बालनाटय' निर्मितींची छायाचित्रं, वेशभूषा, नेपथ्य, रंगभूषा इत्यादींची मूळ रेखाचित्रं वगैरेचं भरगच्च प्रदर्शन.

९. बालरंगभूमीच्या विविध प्रश्नांसंबंधी, चर्चा, परिसंवाद, व व्याख्यानं.

१०. 'बालनाटय'च्या कार्याविषयी माहिती देणाऱ्या व एकंदर बालरंगभूमीला उपयुक्त अशा स्मरणिकेचं प्रकाशन.



## आनंद-यात्रा

सुसज्ज रंगमंचावर केलेलं नाटक, आलिशान एअरकंडिशन्ड नाटयगृहात बसून, पॉपकॉर्न खातखात पाहाणं, भारतात सगळयाच मुलांना शक्य होतं का? ज्यांना ते होतं, त्यांच्यासाठी, चित्रपट, दूरदर्शन, व्हीडीओ, ही आणखीही करमणुकीची साधनं उपलब्ध असतातच. पण अशी कैक मुलं आहेत, की जी समाजानं लादलेलं कष्टाचं, दारिद्र्याचं जिणं जगताहेत. ही मुलं करमणुकीसाठी हपापलेली आहेत. त्यांच्यावर कसलेच सुसंस्कार कोणी करीत नाही. साधी मनमुराद हसण्याची संधीदेखील त्यांना

मिळत नाही. अशा मुलांना खरं तर नाटकांची, त्याद्वारे होणाऱ्या संस्कारांची, आणि शुद्ध रंजनाची देखील फार फार गरज आहे. अशी लाखो मुलं झोपडपट्ट्यांतून, सुधार-केंद्रांतून, खेडयापाडयांतून, इस्पितळांतून पसरलेली आहेत. त्यांच्यासाठी बाल-रंगभूमी काही करू शकेल का?

या विचारानं, सहा वर्षांपूर्वी आम्ही 'आनंदयात्रा' ही 'बालनाटय'ची शाखा काढली, आणि निरनिराळया वस्त्यांमधून मुलांसाठी नाटकांचे प्रयोग केले. जिथं रंगमंच उभारणं शक्य नव्हतं, तिथं भाडयानं घेतलेला ट्रक उभा करून, त्याची पाखं पाडून त्यावर प्रयोग केले. सुधार केंद्रात कोंडल्या गेलेल्या मुलांना बाहेरच्या वाऱ्याची झुळूक दाखवली. टाउन हॉलसमोरच्या हॉर्निमन सर्कल गार्डनमधे खेळायला जमलेल्या मुलांना, नाटक पाहायची संधी दिली. एवढंच नाही, तर हॉस्पिटलच्या चिल्ड्रन्स वॉर्डमधे नाटक करून, किंकाळया आणि हुंदके ऐकण्याची संवय झालेल्या भिंतींना मुलांच्या निखळ हास्यानं रोमांचित केलं. या प्रयोगांमधे डॉ. मनोहर, डॉली ठाकोर, यांच्यासारख्या, समाजपरिवर्तनाचा विचार करणाऱ्या मंडळींची खूप मदत झाली.

हे नाटयप्रयोग अर्थातच विनामूल्य दाखवण्यात आले. त्यांच्या खर्चाचा भार कधी कोणा उदार व्यक्तींनी, तर कधी सामाजिक संस्थांनी उचलला. टर डी होम्स (वेस्ट जर्मनी) सारख्या, परदेशातल्या संस्थादेखील या आनंदकार्यात सामील झाल्या. 'कास्प-प्लान' या संस्थेच्या मदतीनं, विक्रोळीतल्या झोपडपट्टीमधल्या मुलांसाठी एका बालनाटयाची निर्मिती करायचं ठरलं, तेव्हा मनात आलं, की या मुलांना रंजन तर हवंच: पण परीकथेतल्यासारखं गोंडस जीवन, त्यांच्या कष्टाच्या आयुष्याशी विसंगत नाही का? मग एक जगप्रसिद्ध परीकथा घेतली: पण तिच्यातल्या लुटुपुटीच्या संकटांच्या जागी झोपडपट्टीतल्या मुलांच्या खऱ्याखुऱ्या, ओळखीच्या समस्या घातल्या. उदाहरणार्थ, 'पैसे मातीत पूर, त्यांचं झाड येईल' असं म्हणणाऱ्या कोल्हयाऐवजी, जुगारांत पैसे लावायला भाग पाडणारा जुगारी दाखवला. 'बुटबैंगण' नाटकांतला हा प्रयोग मुलांना पटला, समजला, आवडला.

आपल्या देशात बहुसंख्येनं असलेल्या या गरीब मुलांच्या करमणुकीसाठी, त्यांच्या गांजलेल्या, वैराण आयुष्यात आनंदाचे चार थेंब शिंपडण्यासाठी काही करावं, असं ज्यांच्या मनात येतं, त्यांच्या दातृत्वावर आनंदयात्रेची भिस्त आहे. त्यांना अधिक कांही न जमल्यास एका-अर्ध्या-पाव प्रयोगाची जरी आर्थिक जबाबदारी त्यांनी उचलली, तरी आजच्या संत्रस्त जगात थोडासा आनंद फुलवण्याचं श्रेय त्यांना मिळेल.

अशा समंजस, सहृदय व्यक्तीपैकी तुम्ही एक आहात. मग, होणार ना या आनंदयात्रेत सामील? अधिक माहिती 'बालनाटय'च्या पत्त्यावर मिळेलच. लिहा, नाहीतर एक फोन का नाही करीत?

आपली,

**प्रतिमा मतकरी**

## रौप्य महोत्सवी वर्षास शुभेच्छा!

रत्नाकर मतकरींची पुढील बालनाटचे
आम्ही प्रकाशित केली. . . .



कळलाव्या कांद्याची कहाणी ● अचाट गावची अफाट मावशी
● गाणारी मैना ● अदृश्य माणूस ● राक्षसराज झिंदाबाद
● इंद्राचे आसन-नारदाची शेंडी ● घडपडे बडबडे आणि मंडळी
● अलबत्या गलबत्या ● निम्मा शिम्मा राक्षस ● बुटबैंगण

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

'बालनाट्य'च्या रौप्य महोत्सवी वर्षास
हार्दिक शुभेच्छा!

**मॅजेस्टिक बुक स्टॉल**

गिरगाव नाका, मुंबई ४०० ००४